# प्रेसनोट दि. १२/०९/२०१८

## सराईत गुंडास पिस्टल व एक काडतुसासह दरोडा प्रतिबंधक पथकाकडून जेरबंद

oooooooooooooooooooooooooooooo

दरोडा प्रतिबंधक पथकाकडील पोलीस नाईक सचिन अहिवळे, यांना त्यांचे खास बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, कोथरूड पोलीस स्टेशन मधील रेकॉर्डवरील गुंड अक्षय साहेबराव ठेंबे, वय २४ वर्षे, रा. इंदीरा शंकरनगरी, बल्लाळ सोसायटी, फ्लॅट नं २, पौंड रोड, कोथरुड, पुणे हा भुसारी कॉलनी या ठिकाणी येणार आहे. त्याच्याकडे अवैध गावठी बनावटीचे पिस्टल असुन त्याने अंगात मरुन रंगाचे टि-शर्ट व ग्रे रंगाची पॅन्ट घातलेली आहे त्यानुसार पोलीस निरीक्षक, राजेंद्र कदम व त्यांचे अधिनस्त पोलीस कर्मचारी यांनी सापळा रचुन त्यांस दि. १२/०९/२०१८ रोजी ०१.१० वा. चे सुमारास जेरबंद करुन त्याचे कब्जातून एक गावठी बनावटीचे पिस्टल व १ राऊंड, असा सर्व मिळून ४०,२००/- रु. किंमतीचा माल जप्त केला आहे. त्याचेविरुध्द कोथरूड पोलीस स्टेशन,पुणे येथे भारतीय हत्याराचा कायदा कलम ३ सह (२५), व मु.पो.ॲक्ट कलम ३७ (१)(३) सह १३५ प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे. सदर आरोपी हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन, त्यांचे विरुध्द या अगोदर कोथरूड पोलीस स्टेशनला दरोड्याचा गुन्हा दाखल आहे.त्यांने शस्त्र का खरेदी केले आहे या बाबत पोलीस तपास करीत आहेत.

सदरची कामगिरी गुन्हे शाखेचे अपर पोलीस आयुक्त श्री.प्रदिप देशपांडे, पोलीस उप आयुक्त श्री.शिरीष सरदेशपांडे व सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१, श्री समीर शेख, यांचे सूचनेप्रमाणे दरोडा प्रतिबंधक पथक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक,राजेंद्र कदम व कर्मचारी यशवंत आंब्रे, शंकर पाटील, राहुल घाडगे, सचिन गायकवाड, सचिन अहीवळे, शैलेश सुर्वे, संदिप ठाकरे, विल्सन डिसोझा यांनी सदरची कारवाई केलेली आहे.